NAAC'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प रि प त्र क

**विषय -** **कार्यालयीन उपस्थितीबाबत**

**संदर्भ -** १. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांचे जा. क्र. नैआ/कोरोना विषाणू/आरआर/६३५/२०२०, दिनांक १८/०७/२०२०

२. विद्यापीठ परिपत्रक जा.क्र. आस्थापना /९७७ दि.०६ जून, २०२०.

३. विद्यापीठ परिपत्रक जा.क्र. आस्थापना /१००० दि.१२ जून, २०२०.

४. महाराष्ट्र शासन महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुर्नवसन विभाग शासन आदेश क्रमांक डीएमयू/२०२०/सीआर.९२ /डी. एम-१, दिनांक ४ जून,२०२०

सर्व सबंधिताना कळविण्यात येते की, विद्यापीठ कार्यालयाच्या उपस्थितीबाबत उपरोक्त संदर्भ क्र. २ च्या परिपत्रकान्वये विद्यापीठातील अत्यावश्यक सेवा प्रदान करणारे विभाग वगळता इतर प्रत्येक विभागातील शिक्षकेत्तर अधिकारी व सेवकांपैकी **१५%** याप्रमाणे अधिकारी व सेवकानां आळीपाळीने (Rotation) कार्यालयात बोलावून कार्यालयीन कामकाज सुरु आहे. परंतु उपरोक्त संदर्भ क्र. १ अन्वये मा. जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, कोल्हापूर यांचे कोल्हापूर जिल्हयातील कोरोना पॉझिटिव्ह रूग्ण संख्या वाढत असल्याने कोल्हापूर जिल्हयात दिनांक २०/०७/२०२० रोजी ते दि.२६/०७/२०२० पर्यंत अत्यावश्यक सेवा व आस्थापना वगळता उर्वरित सर्व आस्थापना, सेवा, नागरिक व वाहने यांची हालचाल संपूर्णत: बंद ठेवणेचे आदेश प्राप्त झालेले आहेत.

त्यानूसार आपणास कळविण्यात येते की, दिनांक २०/०७/२०२० ते दि.२६/०७/२०२० पर्यंत विद्यापीठातील अत्यावश्यक सेवा प्रदान करणारे विभाग (आरोग्य विभाग, अभियांत्रिकी विभाग, अभियांत्रिकी विभागअर्तंगत सेवा देणारे इतर विभाग, सुरक्षा विभाग, उद्यान विभाग इ.) आवश्यकतेनूसार सुरू राहतील. अधिविभागातील शिक्षकांनी शैक्षणिक कामकाज घरी राहून (Work From Home) करावे. सदर कालावधीत अधिविभाग प्रमुख यांना आवश्यक वाटलेस त्यांचे सुचनेनूसार संबधित शिक्षकांनी अधिविभागत उपस्थित रहावे. याव्यतिरिक्त सर्व अधिविभाग / प्रशासकीय विभागाच्या विभाग प्रमुख यांनी विभागातील एकुण अधिकारी व सेवकांपैकी किमान **५%** अधिकारी व सेवकांना आळीपाळीने (Rotation) कार्यालयात बोलावून कार्यालयीन कामकाज सुरू ठेवावे. तसेच, प्रशासकीय विभाग प्रमुख यांना उर्वरित अधिकारी / सेवकांची सेवा आवश्यक वाटल्यास त्यानूसार त्यांनी संबधित अधिकारी / सेवकांना बोलविल्यास त्यांनी कार्यालयात उपस्थित रहावे. यानूसार कार्यावाहीचे नियोजन संबधित विभाग प्रमुख यांनी करावे. ज्या अधिकारी / सेवकांना कार्यालयात उपस्थित राहणेपासून सूट मिळेल त्यांनी घरी राहून (Work From Home) कार्यालयीन काम करावे.

याबरोबरच परीक्षा विभागातील अधिकारी व सेवकांनी परीक्षेच्या अत्यावश्यक कामकाजासाठी संबधित विभाग प्रमुख यांच्या निर्देशानूसार कार्यालयात उपस्थित रहावे. उपस्थित अधिकारी व शिक्षकेत्तर सेवकांनी कोरोना विषाणू प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने व कार्यालयाने केलेल्या उपाययोजनाचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

**(डॉ. विलास द. नांदवडेकर)**
कुलसचिव

**जा.क्र. आस्थापना/** 1189
**दि.** 19 JUL 2020
**प्रति,**

१) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, व सेवक

२) मा.प्रभारी कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.

३) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर
स्वराज्य भवन, नागाळा पार्क, कोल्हापूर - ४१६००२
दुरध्वनी क्रमांक : 0231-2659232 टोल फ्री (1077)
Email: rainkolhapur@gmail.com

सत्यमेव जयते

जा.क्र. नैआ/कोरोना विषाणू/आरआर/६३५/२०२०, दिनांक :- १८/०७/२०२०

वाचले :-

१. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७.
२. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५,
३. फौजदारी प्रकिया संहिता, १९७३ चे कलम १४४.
४. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील क्रमांक करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य-५, दिनांक १३/०३/२०२०, १४/०३/२०२० तसेच १५/०३/२०२० रोजीच्या अधिसुचना.
५. महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना No.DMU/२०२०/CR.९२/DisM-१, दिनांक २३ व २४ मार्च २०२०.
६. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील No. DMU /२०२०/CR.९२/DisM-१, दिनांक २९/०६/२०२० रोजीचे आदेश.

---

**विषय :- कोरोना विषाणू (कोविड-१९) प्रादुर्भाव कमी करणेसाठी प्रतिबंधात्मक आदेश.**

## -: आदेश :-

ज्याअर्थी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र दिनांक १४ मार्च २०२० अन्वये कोरोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ मधील तरतूदींच्या अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमीत करणेत आलेली आहे आणि त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केली असून जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाय योजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. त्याच प्रमाणे आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील तरतुदी प्रमाणे जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण हे कोणतीही आपत्ती रोखण्यासाठी किंवा आपत्तीविरुध्द प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यासाठी सक्षम प्राधिकारी आहेत.

ज्याअर्थी, कोल्हापूर जिल्हयातील कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण संख्या झपाट्याने वाढत आहे. अशा परिस्थितीत समुह संसर्ग होण्याचा धोका संभवत आहे. त्यामुळे कोल्हापूर जिल्ह्यात कोरोना या विषाणुचा संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक असलेची माझी खात्री झालेली आहे.

आणि ज्याअर्थी, मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील No. DMU/२०२०/CR.९२/DisM-१, दिनांक २९/०६/२०२० रोजीच्या आदेशामध्ये त्या त्या जिल्ह्यातील परिस्थिती प्रमाणे संबंधीत जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांना जिल्ह्यातील रुग्ण स्थितीनुसार आदेश काढणेबाबत सर्वाधिकार देणेत आलेले आहेत.

त्याअर्थी, मी, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, कोल्हापूर **जिल्ह्यात दिनांक १९/०७/२०२० रोजी रात्री १२.०० वा. ते दिनांक २६/०७/२०२० रोजी रात्री १२.०० वा. पर्यंत खालील बाबी वगळता सर्व आस्थापना, सेवा, नागरिक व वाहने यांची हालचाल संपूर्णत: बंद ठेवणेचे आदेश देत आहे. यामध्ये फक्त सुट दिलेल्या बाबी, सेवेतील वाहने व प्रवासी वगळून उर्वरित सर्व कोल्हापूर जिल्ह्यात येणारी व जिल्ह्याबाहेर जाण्यास प्रवासी व वाहनांना तसेच लग्न, साखरपुडा, मुंज, वाढदिवस इ. कार्यक्रमांना बंदी असेल. बंदी आदेशातुन सुट दिलेल्या बाबी दुध, औषधे इ. सेवांसाठी नागरिकांना सकाळी ०६.०० ते सकाळी ०९.०० व सायंकाळी ०५.०० ते सायंकाळी ०७.०० या कालावधीत खाजगी आस्थापनामध्ये जाता येईल. अत्यावश्यक व तातडीच्या वेळी मात्र नागरिकांना इतर वेळी अत्यावश्यक बाबी व सेवा घेता येतील.**

**उपरोक्त बंदी आदेशातुन खालील बाबींना सुट देणेत येत आहे.**

**अ) अत्यावश्यक सेवा व आस्थापना.**

१) सर्व खाजगी व सार्वजनिक वैद्यकीय सेवा, पशूचिकित्सा सेवा, औषध सेवा, हॉस्पीटल संलग्न सेवा देणाऱ्या आस्थापना.
२) बँक एटीएम, कॅश रीप्लेनिशिंग एजन्सी (CRA) ची कामे सुरु राहतील.
३) मा. न्यायालये व अत्यावश्यक सेवेतील राज्य व केंद्र सरकारी कार्यालये कमीत कमी अधिकारी / कर्मचारी यांचे उपस्थितीत सुरु राहतील.

२/...

Scanned by CamScanner

४) दैनिक वर्तमानपत्रे, नियतकालिके, यांची छपाई व वितरण व्यवस्था तसेच डिजीटल/प्रिंटमिडिया यांची कार्यालये शासकीय नियमानुसार सुरु राहतील. वर्तमानपत्रे वितरण सकाळी 5.00 ते सकाळी 9.00 या वेळेमध्ये अनुज्ञेय राहील.

५) सर्व वैद्यकीय, परिचारिका, पॅरामेडिकल कर्मचारी, सफाई कर्मचारी व ॲम्ब्यूलन्स यांना वाहतूकीसाठी परवानगी राहील. त्यासाठी वेगळा पास अथवा परवानगी घेणेची आवश्यकता नाही.

६) पेट्रोल/डिझेल पंप **फक्त अत्यावश्यक सेवेतील शासकीय वाहने**, वैद्यकीय सुविधा पुरवणारी वाहने व शासकीय धान्य पुरवठा करणारी वाहने इ. साठीच सुरु राहतील.

७) वृध्द व आजारी व्यक्तीकरिता नियुक्त केलेले मदतनीस यांच्या सेवा सुरु राहतील.

**ब) जीवनावश्यक सेवा व आस्थापना.**

१) दुध संकलन, वाहतूक सकाळी ०५.०० वा. ते सकाळी ०९.०० वा. व सायंकाळी ०४.०० ते सायंकाळी ०७.०० वा. पर्यंत सुरु राहील.

२) किरकोळ दुध विक्री व घरपोच दुधाचे वितरण सकाळी ०६.०० ते सकाळी ०९.०० वा. पर्यंत सुरु राहील.

३) एलपीजी गॅस घरपोच वितरण करणाऱ्या आस्थापना सकाळी ०९.०० ते सायंकाळी ०७.०० वा. पर्यंत.सुरु राहतील.

४) ग्रामपंचायत, नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रातील सांडपाणी, घनकचरा व्यवस्थापन व पिण्याचे पाणी पुरवठा करणाऱ्या आस्थापना सकाळी ०९.०० ते सायंकाळी ०७.०० वा. पर्यंत सुरु राहतील.

५) दुरध्वनी, इंटरनेट व बँक एटीएम संबंधीत आस्थापना सकाळी ०.९.०० ते सायंकाळी ०७.०० पर्यंत सुरु राहतील

६) वंदे भारत योजनेंतर्गत कोविड-१९ करिता वापरात असलेले हॉटेल, डॉक्टर्स, स्टाफ, नर्स व संस्थात्मक अलगीकरण साठी घेतलेले हॉटेल, लॉज व इतर इमारती सूरु राहतील.

**क) उद्योगधंदे**

१) कोल्हापूर जिल्ह्यातील शहरी भागातील सर्व उद्योगधंदे बंद राहतील. परंतू ज्या उद्योगधंद्यात व बांधकामांचे साईटवर कामगारांना पूर्ण वेळ राहणेची सोय आहे असे कामगार व त्या उद्योगातील माल वाहतूक बाहेर न करणेच्या अटीवर असे उद्योग व बांधकामे सुरु ठेवणेस परवानगी असेल. त्याचप्रमाणे अत्यावश्यक सेवेचे काम करणाऱ्या माहिती तंत्रज्ञान आस्थापना १५% कर्मचारी क्षमतेने सुरु राहतील.

२) ग्रामीण भागातील एमआयडीसी किंवा खाजगी किंवा सहकारी औद्योगिक वसाहतीतील सर्व औद्योगिक आस्थापना तसेच अत्यावश्यक सेवेचे काम करणाऱ्या माहिती तंत्रज्ञान आस्थापना २५% कर्मचारी क्षमतेने सुरु राहतील.

अशा आस्थापनांनी त्यांची कर्मचारी क्षमता प्रादेशिक अधिकारी, म.औ.वि.मं. व जिल्हा उद्योग अधिकारी (DIC) यांचेकडून प्रमाणित करुन घ्यावी. या आस्थापनेमधील सर्व अधिकारी / कर्मचारी /कामगार यांनी त्यांचे ओळखपत्र व उद्योग विभागातील संबंधीत अधिकारी यांनी प्रमाणित केलेले आस्थापनेचे पत्र सोबत बाळगणे बंधनकारक राहील.

**ड) ग्रामीण भागातील शेतीची कामे.**

**इ) इतर**

१) अंत्यसंस्कार / अंत्ययात्रे साठी जास्तीत जास्त १० नातेवाईक / नागरिक यांना हजर राहता येईल. मृत व्यक्तींच्या नजीकच्या व्यक्तींचे सांत्वन शक्यतो दूरध्वनीवर करणेबाबत सुचित करण्यात येत आहे.

**ई) कोल्हापूर जिल्ह्यातील प्रतिबंधात्मक क्षेत्रामध्ये उपविभागीय दंडाधिकाऱ्यांचे आदेशाप्रमाणे अत्यावश्यक व जीवनावश्यक वस्तू व सेवा वगळता इतर सर्व प्रकारच्या आस्थापना बंद राहतील.**

बंदी आदेशातुन सुट दिलेल्या सर्व सेवा व आस्थापनामध्ये वावरणाऱ्या सर्व व्यक्तींनी पूर्ण वेळ मास्क, सॅनिटायझर व सुरक्षीत अंतर इ. बंधने पाळणे आवश्यक आहे.

उपरोक्त आदेशाचे पालन न करणाऱ्या कोणतीही व्यक्ती अथवा संस्थेवर भारतीय दंड संहीता १८६० (४५) च्या कलम १८८, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ व साथ रोग नियंत्रण कायद्यातील तरतुदी प्रमाणे फौजदारी कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**(दौलत देसाई)**
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, कोल्हापूर**

प्रति :- सर्व नागरिक व आस्थापना.

प्रत :- १. आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर
३. पोलीस अधीक्षक, कोल्हापूर
४. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापूर

Scanned by CamScanner

५. प्रादेशिक परिवहन अधिकारी, कोल्हापूर
६. सहा. आयुक्त, अन्न व औषध प्रसाधन, कोल्हापूर
४. उपविभागीय दंडाधिकारी (सर्व)
५. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी (सर्व)
६. मुख्याधिकारी, (सर्व) नगरपालिका / नगरपरिषद / नगरपंचायत.
७. सर्व संबंधीत ग्रामपंचायती.
८. जिल्हा माहिती अधिकारी, कोल्हापूर यांचेकडे उपरोक्त् आदेश जनतेच्या माहितीसाठी कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व दैनिक/दृकश्राव्य माध्यमातून ठळक बातमी स्वरुपात प्रसिध्द करुन, प्रसिध्दी अहवाल इकडे द्यावा.

Scanned by CamScanner

Estd. 1962
NAAC 'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

**विषय -** **कार्यालयीन उपस्थितीबाबत**

**संदर्भ-** १. विद्यापीठ परिपत्रक जा.क्र. आस्थापना /८६६ दि.१४ एप्रिल, २०२०.
२. विद्यापीठ परिपत्रक सलंग्नता टी. १ जा.क्र. १५३३ दि.०३ जून, २०२०.
३. महाराष्ट्र शासन महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग शासन आदेश क्रमांक डीएमयू/२०२०/ सीआर.९२/ डी.एम-१, दिनांक ३१ मे,२०२०
४. महाराष्ट्र शासन महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग शासन आदेश क्रमांक डीएमयू/२०२०/सीआर.९२ /डी. एम-१, दिनांक ४ जून,२०२०
५. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय जा. क्र. नेआ/कोरोना विषाणू/आरआर /५०३/२०२० दि.४/६/२०२०

करोना विषाणूचा संसर्ग होवू नये व प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक व तातडीची उपाययोजना म्हणून महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार उपरोक्त संदर्भीय क्र. १ व २ अन्वये महाविद्यालयातील / विद्यापीठातील शैक्षणिक अधिविभाग, प्रशासकीय विभाग हे पुढील आदेश होईपर्यंत बंद राहतील. व सदर कालावधीत घरी राहून आवश्यक ती शैक्षणिक कामे शिक्षक यांनी तसेच प्रशासकीय कामे अधिकारी व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी करावीत असे आदेश निर्गमित करण्यात आलेले होते.

सद्या उपरोक्त संदर्भ क्र. ३ ते ५ अन्वये मुख्य सचिव, आपत्ती व्यवस्थापन, महाराष्ट्र शासन तसेच जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, कोल्हापूर यांचेकडून सुधारीत मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केलेली आहेत. सदर आदेशामध्ये दिलेल्या सुचनाच्यां अनुषंगाने विद्यापीठातील अधिविभाग, प्रशासकीय विभाग व संलग्नित महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था यांचे प्राचार्य/संचालक यांच्या प्रशासकीय कामकाजाकरिता खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

१. अत्यावश्यक सेवा प्रदान करणारी विभाग वगळता इतर प्रत्येक विभागातील विभाग प्रमुख यांनी विभागातील शिक्षकेत्तर अधिकारी व सेवकांपैकी **१५%** याप्रमाणे अधिकारी व सेवकानां आळीपाळीने (Rotation) कार्यालयात बोलावून कार्यालयीन कामकाज करुन घेण्यात यावे. तसेच विभाग प्रमुख यांना उर्वरित सेवकांची सेवा आवश्यक वाटल्यास त्यानूसार त्यांनी संबधित सेवकांना बोलविल्यास त्यांनी कार्यालयात उपस्थित रहावे. याचे नियोजन संबधित विभाग प्रमुख यांनी करावे. ज्या कर्मचा-यांना कार्यालयात उपस्थित राहणेपासून सूट मिळेल त्यांनी घरी राहून (Work From Home) कार्यालयीन काम करावे. रजेवर असणाऱ्या या कर्मचाऱ्यांचा यामध्ये समावेश करु नये.

३. उपरोक्त नूसार संबधित विभाग प्रमुख यांनी विभागातील प्रत्येक अधिकारी / सेवक आठवड्यात किमान एक दिवस कार्यालयात उपस्थित राहतील याची दक्षता घ्यावी.

४. विभाग प्रमुख यांच्या आदेशानुसार सदर अधिकारी / सेवक यांनी कार्यालयात उपस्थित राहणे अनिवार्य राहिल.

५. महाविद्यालयातील / विद्यापीठातील जे अधिकारी कर्मचारी मुख्यालय सोडून बाहेर गावी आहेत त्यांनी महाराष्ट्र शासन व जिल्हाधिकारी यांच्या सूचनेनूसार विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन मुख्यालयाच्या ठिकाणी पोहचण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी, जेणेकरुन आवश्यकतेनुसार त्यांच्या सेवा उपलब्ध होतील.

६. विभाग प्रमुख यांनी उपस्थित अधिकारी/ सेवकांची उपस्थिती दिवस व कामाचे स्वरुप यांच्या नोंदी (रोस्टर) ठेवण्यात याव्यात.

७. प्रतिबंधित क्षेत्रात निवास असणाऱ्या शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांना कार्यालयीन कामकाजाकरिता बोलावू नये तसेच त्यांना घरी राहून (Work From Home) काम करण्याबाबत सूचना द्याव्यात. मात्र अशा सेवकांनी विभाग प्रमुख यांचेकडे ई-मेलव्दारे कळवावे.

८. अत्यावश्यक सेवा प्रदान करणारी कार्यालये (सुरक्षा विभाग, आरोग्य विभाग व अभियांत्रिकी इ. अंतर्गत असलेली अत्यावश्यक सेवा) पूर्ण क्षमतेने कार्यरत राहतील

९. उपस्थित सर्व अधिकारी/ कर्मचारी यांनी शासनाने वेळोवेळी कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे.

१०. सदर आदेश पुढील आदेश निर्गमित होई पर्यंत लागू राहतील.

**(डॉ. विलास द. नांदवडेकर)**
कुलसचिव

**जा.क्र. आस्थापना/** ९०७
**दि.** 6 JUN 2020
**प्रति,**

१) संलग्नित महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था यांचे प्राचार्य / संचालक
२) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, व सेवक
३) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.
४) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
- यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

Estd. 1962
NAAC 'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प रि प त्र क

**विषय -** **कोव्हीड -१९ साथ उद्रेक कालावधीमध्ये कार्यालयाबाबत मार्गदर्शक सूचना....**

**संदर्भ-** १. विद्यापीठ परिपत्रक जा.क्र. आस्थापना /९७७ दि.६ जून,२०२०.
२. महाराष्ट्र शासन सार्वजिनक आरोग्य विभाग पत्र क्र. न्यायीक२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.३० मे,२०२०
३. जिल्हाअधिकारी कार्यालय, कोल्हापूर, राजशिष्टाचार विभाग क्र. कार्या.२/राशि/ आरआर- २०२० दि. ३१/५/२०२०

उपरोक्त विषयसंदर्भीय पत्रासअनुसरुन सर्व संबधिताना कळविण्यात येते की, राज्य सरकारच्या मार्गदर्शक सूचनानुसार विद्यापीठ कार्यालय टप्या टप्याने कार्यरत होत आहेत. नजीकच्या कालावधीमध्ये कार्यालयामधील कर्मचाऱ्यांची आणि अभ्यागतांची संख्या वाढणार आहे. कार्यालयामध्ये वर्दळ वाढल्यामुळे कोव्हीड- १९ विषाणूचा प्रसार होवू नये यासाठी उपरोक्त संदर्भ क्र. २ व ३ नूसार मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. सदर सूचनांची अंमलबजावणी करणेबाबत महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग व जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांनी कळविलेले आहे. त्यास अनुसरुन खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

१. उपरोक्त संदर्भीय क. २ अन्वये प्राप्त झालेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार अवलंब करावे, त्यामध्ये कोणत्याही प्रकारे दुर्लक्ष अथवा कसुर होणार नाही दक्षता घ्यावी. **(मार्गदर्शक सूचनाची प्रत सोबत जोडलेली आहे.)**

२. सर्व अधिविभाग / प्रशासकीय विभागप्रमुख यांनी आपल्या विभागासाठी ७० % अल्कोहोल असलेले सॅनिटायझर, २ % सोडियम हायपोक्लोराईट सोल्युशन, आवश्यकतेनूसार सॅनिटायझेशन मशिन व विभागातील शिक्षक, अधिकारी, व कर्मचारी यांचेसाठी तीन पदरी मास्कच्या (Wildcraft) प्रत्येकी तीन नग विद्यापीठाच्या अकौंट कोडनुसार आपल्या विभागाच्या लेखाशिर्षामधून खरेदी करण्यात यावेत.

३. सर्व अधिविभाग / प्रशासकीय विभागप्रमुख अभ्यागंताना प्रवेश देताना कोणत्या बाबी निकडीच्या आहेत, तसेच शासन सूचनेनुसार आपल्या विभागाची कार्यपध्दती निश्चित करुन त्यानूसार सूचना / नियमावली तयार करुन प्रसिध्द करण्यात यावी. त्याची प्रत मा. कुलसचिव कार्यालय, सुरक्षा विभाग व आस्थापना विभागास देण्यात यावी.

४. विद्यापीठातील / महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी / विद्यार्थीनी, पालक आणि अभ्यागतांनी आपल्या किवा विभागाच्या कामाचा पाठपुरावा दुरध्वनी/ इंटरकॉम, इ-मेलव्दारे करावा. कार्यालयीन कामकाजात E-office तसेच बैठकीसाठी व्हिडीओ कॉन्फरन्सचा जास्तीत जास्त वापर करावा. प्रत्यक्ष भेटणे / एकत्रित येणे टाळावे.

५. विद्यापीठामध्ये प्रवेश करताना विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी व कर्मचारी तसेच महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी आणि अभ्यागतांनी आपले ओखळपत्र सुरक्षा रक्षकास सहजासहजी निदर्शनास येईल असे धारण करुन तोंडाला मास्क लावणे अनिवार्य आहे.

६. विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी व कर्मचारी तसेच महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी आणि अभ्यागतांनी कार्यालयात येताना-जाताना, काम करत असताना, जेवण करत असताना किंवा सुटटीच्या वेळी एकत्रित जमा होणे टाळावे.

७. सर्व अधिविभाग / प्रशासकीय विभागप्रमुख यांनी सोबतच्या सूचनेनूसार दोन कर्मचारी यांचेमधील किमान तीन फुट अंतर, मास्क वापरणे, वांरवार हात धूणे इ. आवश्यक बाबींची अंमलबजावणी होणेत कसून होणार नाही याची दक्षता घ्यावी.

८. विभागप्रमुख यांनी विभागातील टेबल-खुर्च्या व इतर साहित्य स्वच्छतेबाबतची योग्यती कार्यवाही वर्ग-४ मधील कर्मच्यारीकंडून करुन घ्यावी.

९. विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी व कर्मचारी तसेच महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी आणि अभ्यागतांनी कोव्हीड- १९ विषाणूचा प्रसार होवू नये व आपले आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी शासन प्राप्त सूचेनानुसार विद्यापीठ प्रशासनाने केलेल्या उपाययोजनेस सहकार्य करावे.

१०. सर्व अधिकारी/ कर्मचारी यांनी शासनाने वेळोवेळी कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे.

(डॉ. विलास द. नांदवडेकर)
कुलसचिव

जा.क्र. आस्थापना/ -1000
दि. 12 JUN 2020
प्रति,
१) संलग्नित महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था यांचे प्राचार्य / संचालक
२) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, व सेवक
३) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.
४) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.
- यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.